# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Karnaja**

**Date of Good Work done** :- **24/05/2020**

**Brief of the work done :-**

कारंजा शहरात घडले खाकीतील माणुसकीचे दर्शन, ठाणेदार पाटील यांच्या प्रयत्नाने वालहई येथील वृद्ध महिलेला मिळाला आधार दि. २४/०५/२०२०

# कारंजात घडले खाकीतील माणूसकीचे दर्शन

**कारंजा ▪ तालुका प्रतिनिधी**

पोलीस अधिकारी म्हटले की डोळ्यापुढे उभे राहते ते कर्तव्यकठोर व माणूसकी न जपणारी व्यक्तीरेखा; परंतु कारंजात मात्र एका खाकीतील अधिकाऱ्याची एक वेगळी व्यक्तीरेखा पहावयास व अनुभवास मिळाली.

कारंजा तालुक्यातील वालई येथील एक वृध्द महिला निराधार असल्याने २२ मे रोजी कारंजा अमरावती मार्गावरील भिलखेडा संस्थानजवळ एकटीच बसली असल्याची माहिती सर्वधर्म आपतकालीन संस्थेला मिळाली. अध्यक्ष श्याम सवाई यांनी ही माहिती ठाणेदार पाटील यांच्या कानी घातली. ठाणेदार पाटील यांनी क्षणाचाही विलंब न लावता आपल्या सहकाऱ्यांसमवेत घटनास्थळ गाठून त्या वृध्द महिलेची आपबीती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तीच्या कथनानुसार सदर महिलेचे नाव कमलाबाई बरघट असे असून ती वालई येथील रहिवाशी आहे. गेल्या १५ दिवसांपूर्वी



तीच्या नातवांने तीला मारहाण केल्याने तीने घर सोडले व खाण्यापिण्याच्या शोधात वणवण भटकु लागली.

अशातच २२ मे रोजी ही महिला काही जागृत नागरिकांच्या दृष्टीस पडल्याने त्यांनी सासला माहिती दिली व ठाणेदार पाटील यांच्या प्रयत्नाने त्या निराधार वृध्द महिलेला आधार मिळाला. सध्यपरिस्थितीत सदर महिलेला कारंजा येथील मुलजीजेठा

## ठाणेदार पाटील यांच्या प्रयत्नाने वालई येथील वृध्द महिलेला मिळाला आधार

हायस्कूलध्ये ठेवण्यात आले असून, पुनम बंग यांच्या ध्यास संस्थेच्यावतीने तीच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. तीच्या साडीचोळीचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान सदर महिलेबाबत जिल्हा महिला व बालकल्याण विभागाला देखील माहिती देण्यात आली. महिला व बालकल्याण विभागाची तालुकास्तरीय टिम मुलजीजेठा हायस्कूलमध्ये दाखल झाली असून, पुढील प्रक्रिया सुरु होती. ठाणेदार पाटील यांच्या प्रयत्नाने एका वृध्द निराधार महिलेचे प्राण वाचले शिवाय संभाव्य अनर्थ टळल्याने कारंजात खाकीतील माणूसकीचे दर्शन घडले, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

ePaper देशोन्नती
Sun, 24 May 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/52184058